RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक १०६(२)] मंगळवार, डिसेंबर २३, २०२५/पौष २, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २४२**

**प्राधिकृत प्रकाशन**

### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे अनुसूची 'घ' प्रकरण १ निवडणूक नियम क्रमांक ८**

**शुध्दीपत्रक**

**क्रमांक भिनिशमनपा/निवडणूक/४५०/२०२५**

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांनी पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ८०/का.५, दि. १५/१२/२०२५ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता अधिसूचना असाधारण भाग दोन असाधारण क्रमांक २२९ वर दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी छापण्यात आली होती, आणि ज्याअर्थी, मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचेकडील पत्र क्रमांक नपप्र/कार्या-२/RO/ARO नेमणूक/२०२५/, दि. २०/१२/२०२५ नुसार सदर **राजपत्रातील** रकाना क्रमांक (२) मधील श्री. प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, ठाणे यांची नेमणूक रद्द करून, मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचेकडील पत्र क्रमांक नपप्र/ कार्या-२/RO/ARO नेमणूक/२०२५/, दि. २०/१२/२०२५ नुसार श्री. गोविंद खामकर, गट विकास अधिकारी, भिवंडी यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. त्याअर्थी, सदर **राजपत्रात** दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, श्री. अनमोल सागर, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर **राजपत्रातील** नोंद दुरुस्त करण्याकरीता खालीलप्रमाणे शुद्धीपत्रक प्रसिद्ध करीत आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार जरुर ती कार्यवाही पार पाडण्यासाठी खालील तक्त्यातील रकाना क्रमांक (६) मध्ये दर्शविलेल्या प्रभागांकरिता रकाना क्रमांक (२) वरील अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तसेच रकाना क्रमांक (३), (४) व (५) मधील अधिकाऱ्यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे :-

| क्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव | सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ यांचे नांव | सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ यांचे नांव | सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३ यांचे नांव | नेमून दिलेले प्रभाग | नामनिर्देशनपत्रांचे वाटप, स्विकृती इ. कार्यवाही करण्याचे व मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| RO-४ | श्री. गोविंद खामकर, गट विकास अधिकारी, भिवंडी | श्री. मयुर चव्हाण, तहसीलदार, विक्रमगड, जिल्हा पालघर | श्री. सुरेंद्र भोईर, सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र.३, भि.नि.श.म.न.पा. | श्री. जितेंद्र हेडाऊ, कार्या. अधिक्षक, प्र.स.क्र. ३, भि.नि.श.म.न.पा. | १७, २१, २२, २३ | वऱ्हाळदेवी माता बहुउद्देशिय सभागृह, तळ मजला, कामतघर, भिवंडी. जि. ठाणे |

**अनमोल सागर** ( **भा.प्र.से.** ),
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

ठिकाण : भिवंडी
दिनांक २३ डिसेंबर २०२५

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.